# <u>विज्ञानाची गोडी....जैवविविधतेची गाडी</u>

हिमालयातलं वाळवंट, पोहणारा वाघ आणि उंट, निळ्या रक्ताचा आणि नऊ डोळ्यांचा खेकडा, जगातलं सर्वात छोटं डुक्कर, जगातील दुसऱ्या क्रमाकांची सर्वात तिखट मिर्ची, चोरी करणारा खेकडा, अशा अद्भुत गोष्टी आपल्या भारताच्या वेगवेगळ्या भागामध्ये आहेत अस सांगितलं तर विश्वास बसेल कुणाचा? पण हि माहिती अगदी खरी आणि वास्तववादी आहे. ती लोकांपर्यंत पोहचवावी यासाठीच सायन्स एक्स्प्रेस - जैवविविधता विशेष (SEBS) हि ट्रेन देशभरात फिरत आहे. देशातील जैवविविधता आणि त्यांचा होणारा ह्रास यांची माहिती लोकांना करून देणे आणि त्याचप्रमाणे तिच्या संवर्धनासाठी जागरूकतेचा संदेश जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम हि ट्रेन करत आहे.

सायन्स एक्स्प्रेस हि १६ डब्यांची अशी एक प्रदर्शन ट्रेन आहे जी २००७ पासून भारतभ्रमण करत आहे. संपूर्ण भारतामधील विज्ञान प्रदर्शनाच्या यशस्वी चार चरणानंतर, हि अभूतपूर्व गाडी २०१२ पासून "सायन्स एक्स्प्रेस - जैवविविधता विशेष" स्वरुपात फिरत आहे भारत सरकारच्या, विज्ञान व तंत्रज्ञान विभाग आणि वन व पर्यावरण मंत्रालय यांचा हा उपक्रम संयुक्त आहे.

यंदा सायन्स एक्स्प्रेस जैवविविधता विशेष २०१३ चे उद्घाटन माननीय मुखमंत्री, दिल्ली श्रीमती शिला दिक्षित, श्री पवन कुमार बंसल, माजी रेल्वे मंत्री आणि श्रीमती जयंती नटराजन, माननीय मंत्री, वन व पर्यावरण मंत्रालय यांचे हस्ते दिनांक ९ एप्रिल २०१३, दिल्ली सफदरजंग रेल्वे स्टेशन, दिल्ली येथे पार पडले. ट्रेनची सध्याची २०१३ ची आवृत्ती ९ एप्रिल ते २८ ऑक्टोबर २०१३ दरम्यान ६२ स्थानकांवर थांबे घेत आहे. प्रत्येक स्थानकावर सामान्यता तीन चार दिवस थांबत असून प्रदर्शन सर्वांसाठी खुले आहे.

ऑक्टोबर २००७ पासून सायन्स एक्स्प्रेस ह्या प्रदर्शनी ट्रेनने आत्तापर्यंत ९८ हजार किमी पेक्षा जास्त अंतर कापले आहे. ११४० दिवसांच्या या संपूर्ण प्रवासातील ३२० थांब्यांमध्ये १ कोटी लोकांनी या ट्रेनला भेट दिली असून, सायन्स एक्स्प्रेस हि देशातील सर्वात मोठी, लांब चालणारी व जास्तीत जास्त लोकांनी बघितलेली विज्ञान प्रदर्शनी आहे.

युनाटेड नेशन्सनी २०११-२०२० हे संपूर्ण दशक जैवविविधता तसेच वाळवंटे आणि जमिनीची धूप होण्यापासून बचाव म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे ९ ते १९ ऑक्टोबर २०१२ दरम्यान झालेल्या UN convention on Biological Diversity च्या ११व्या Conference of Parties (CoP ११) परिषदेचे आयोजनही भारताने हैदराबाद येथे केले होते. त्यानिमित्याने सायन्स एक्स्प्रेसमार्फत जगाला देशातील जैवविविधतेचे दर्शन घडविण्याची तसेच त्यांचे संवर्धन करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती करू देण्यासाठी हि एक उत्तम संधी होती. त्यामुळेच SEBS हि संकल्पना अधोरेखित केली आहे.

भारतातील जैवविविधता वातावरण बदल आणि तत्सम गंभीर प्रश्नाविषयी समाजाच्या सर्व स्तरांमध्ये आणि खासकरून विध्यार्थांमध्ये जागरुकता निर्माण करणे हे या अनोख्या प्रदर्शनीचे मूळ उदिष्ट्य आहे. त्यामुळेच प्रामुख्याने शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी आणि शिक्षक यांना नजरेसमोर ठेऊन हे प्रदर्शन तयार करण्यात आले आहे.

SEBSच्या १६ डब्यांपैकी जैवविविधता दर्शविणारे पहिले आठ डब्बे वन-पर्यावरण मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आले आहेत. यामध्ये देशातील विविध जीव-भौगोलिक विभागांमध्ये पसरलेल्या जैवविविधतेची सखोल माहिती देण्यात आली आहे. यामध्ये हिमालयोत्तर आणि हिमालय (Himalaya & Trans Himalaya), गंगेचे खोरे (The Gangetic Plain), उत्तर पूर्व भारत (North East India), वाळवंट आणि अर्ध-शुष्क क्षेत्र (The Deserts & The Semi-Arid), पश्चिम घाट (Western Ghats), दक्खन द्विकल्प (The Deccan Peninsula), सागरी किनारे आणि बेटे (The Coast & The Islands) यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे समुद्री, किनारी, वन्य, सूक्ष्मजीवजन्य आणि कृषी आदि क्षेत्रातील जैवविविधतेचे विविध पैलूही प्रदर्शनामध्ये दर्शिविण्यात आले आहेत. या जैवविविधतेचा त्या परिसरातील जीवनमानाशी असणारा संबंध आणि त्याचा संवर्धनासाठी येणाऱ्या अडचणी अधोरेखित करण्यात आल्या आहेत.

उर्वरित डब्यांमध्ये वातावरण बदल, जैवविविधता आणि पाणी, टाकाऊ वस्तू नियंत्रण व पर्यावरण अनुकूल तंत्रज्ञान, Carbon Footprint, उर्जा संवर्धन यासंबंधी माहिती देण्यात आली आहे. SEBSच्या एका डब्यामध्ये लहान मुलांकरिता "बाल विभाग" तयार करण्यात आला असून त्यामध्ये बाळाकांकारिता विज्ञान, पर्यावरण आणि गणित याविषयी माहिती मिळते.

या सगळ्यांबरोबरच VASCSCची जॉय ऑफ सायन्स (JOS) लेबहि एका कोचमध्ये कार्यरत आहे. जैवविविधता, वातावरण बदल, पर्यावरण, विज्ञान आणि गणित सारख्या विषयांमधील संकल्पना उमजण्यासाठी या लोकप्रिय प्रयोगशाळेत विद्यार्थी विविध प्रयोग करू शकतात. तसेच हे विषय विद्यार्थ्यांना अधिक चांगल्याप्रकारे समजावून सांगता यावेत यासाठी शिक्षकांसाठी खास प्रशिक्षणही आयोजित केले जाते. त्याविषयी अधिक माहिती व नोंदणीकरिता SEBS गाडीच्या प्रबंधकांचा संपर्क साधावा.

याशिवाय विविध वयोगटाच्या अभ्यागतांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी वेगवेगळे उपक्रमहि राबवण्यात येत आहे. हे उपक्रम नोंदणी करून अथवा संपर्क साधून आयोजित केले जात आहेत. यामध्ये स्थानिक शाळा तसेच इतर संस्थामध्ये पार पडणारी "Outreach Activity" सर्वात लोकप्रिय आहे. याशिवाय Platform Activity द्वारा विद्यार्थी, शिक्षक आणि इतर अभ्यागतां माहिती देण्यात येते. त्याचप्रमाणे सोबत घेऊन जाण्यासाठी माहिती, पोस्टर्स किंवा पत्रिका किंवा साहित्यही मागणी नुसार उपलब्ध करून दिले जाते. प्रदर्शनमधिल माहिती विविध प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांच्या

सहयोगाने तयार करण्यात आली आहे. या संस्थांकडून मिळालेले ज्ञान आणि त्यांची मेहनत या प्रदर्शनातून प्रतिबिंबित होत आहे. वन-पर्यावरण मंत्रालयाने, विज्ञान-तंत्रज्ञान विभागाच्या सहयोगाने जैवविविधातेवरील प्रदर्शन तयार केले आहे. विक्रम ए. साराभाई कम्युनिटी सायन्स सेंटर (VASCSC), अहमदाबाद आणि Centre For Environment Education (CEE), अहमदाबाद यांनी इतर संस्थांच्या मदतीने हि प्रदर्शनी ट्रेन तयार केली आहे. HSBC, UL India, PCRA, Indus Tower यांनीही प्रदर्शनाच्या काही भागाला तसेच परिपुरक उपक्रमांना पाठबळ पुरवले आहे.

भारतभर फिरणाऱ्या SEBSच्या विविध उपक्रमांमध्ये समन्वय साधण्यासाठी विज्ञान-तंत्रज्ञान विभागाने VASCSC ची मदत घेतली आहे. VASCSC चे सुयोग्य, प्रशिक्षित आणि एका समान उदिश्ताने प्रेरित असलेले विज्ञान मार्गदर्शक या ट्रेन सोबत आहेत. प्रदर्शन समजून सांगणे, प्रश्नांना उत्तरे देणे, लोकांना सर्वतोपरी मदत करणे तसेच विविध उपक्रम राबविण्यासाठी हि टीम सदैव दक्ष असते.

प्रदर्शन सर्वांसाठी खुले असून मुख्यता: शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या करिता आहे. अधिक माहिती करिता www.sciencexpress.in ला भेट द्या. प्रदर्शनाला भेट देण्याकरिता अथवा अधिक माहिती साठी sciencexpress@gmail.com या वर Email करा किंवा ट्रेन वर प्रबंधकांना ०९४२८४०५४०७ या क्रमांकावर संपर्क साधावा. शालेय विध्यार्थी आगाऊ नोंदणी करून २०-२० विद्यार्थ्यांच्या समूहा मध्ये JOS मध्ये विविध प्रयोग करू शकतात. JOS प्रयोग शाळेमध्ये सहभागी होण्याकरिता vascsc.jos@gmail.com वर Email करा अथवा ०९४२८४०५४०८ या क्रमांकावर संपर्क साधा.

Science Express टीम सर्व संबंधित विभाग, प्रसार माध्यमे, शैक्षणिक संस्था तसेच प्रत्येकाला अशी विनंती करते कि या प्रतिष्ठित, अनोख्या प्रदर्शनाला अधिकाधिक लोकांपर्यंत पोहाचवण्यासाठी सहकार्य करावे, जेणेकरून अधिकाधिक अभ्यागत याचा लाभ घेऊ शकतील आणि हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडेल.

**कृपया हे लक्ष्यात ठेवा**

- प्रदर्शन सर्वांसाठी खुले आणि विनामूल्य आहे.
- या गोष्टी काताक्ष्याने टाळाव्यात – मोबाइल फोन, कॅमेरा, पिशव्या, काड्यापेट्या, सिगारेट, बिड्या, तंबाखू, पाण्याच्या बाटल्या, इतर द्रव्य पदार्थ आणि अणकुचीदार वस्तू
- प्रदर्शन वेळ - सकाळी १०:०० ते संध्याकाळी ५:००
- विविध ठिकाणच्या तारखांसाठी वेळापत्रक बघावे.
- अभ्यागतांना लांब रांगामध्ये उभे राहावे लागू शकते, तरी पाण्याची बाटली, आणि उन्हापासून सुरेक्षेकारिता समान सोबत असू द्यावे.